# भाज्या

**अधिक माहितीसाठी संपर्क:**
82 7373 3030/82 7373 3535

**क्षेत्रफळ:** 20 गुंटे
**लागवडीचा कालावधी:** ऑक्टोबर – नोव्हेंबर 2025
**अंतर (Spacing):** 5 x 1.5 फूट
**लागवड पद्धत:** गादी वाफा (Raised Bed)
**प्रमुख पिके:** विविध भाज्या – शिराळे, मुळा, काकडी, कारले, बीट, वांगी, टोमॅटो, मिरची, भेंडी, पालक, कोबी, फ्लॉवर, कोथिंबीर इत्यादी.

**जमीन निवड:** पाणी निचरा चांगला होणारी, मध्यम ते भारी, वालुकामिश्रित गाळमिश्र माती भाज्यांच्या लागवडीस योग्य ठरते.

**खत व पाणी व्यवस्थापन:**

- खतांचा वापर माती परीक्षण व तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार करावा.
- रासायनिक व सेंद्रिय खतांचा संतुलित वापर करावा.
- ड्रिप सिंचन उपलब्ध असल्यास अत्यंत फायदेशीर.

**हंगाम (कापणी):**

- पालेभाज्या लागवडीपासून 30–45 दिवसांत तयार होतात.
- फळभाज्या 45–60 दिवसांत तयार होतात.
- काढणी योग्य अवस्थेत करावी म्हणजे गुणवत्तेचे जतन होते.
- काढणीनंतर योग्य साठवणूक करणे आवश्यक आहे. काही भाज्या प्रक्रिया करून त्यांचा टिकाऊपणा (shelf life) वाढवता येतो.

**उत्पादन:** योग्य नियोजन व व्यवस्थापन केल्यास उच्च प्रतीचे आणि वेळेत उत्पादन मिळते.

**कीड व रोग व्यवस्थापन:**

- कीड व रोग यावर नियंत्रणासाठी प्रतिबंधात्मक उपाय महत्वाचे आहेत.
- सेंद्रिय व बॅक्टेरियल खतांचा वापर केल्याने पिकांची रोगप्रतिकारक क्षमता वाढते.
- जैविक कीटकनाशके व बुरशीनाशकांचा वापर फायदेशीर ठरतो.
- 

**प्रमुख कीड:** मावा, पांढरी माशी, फळ माशी, पान खाणारी अळी इ.

**प्रमुख रोग:** मुळकुज, डाग रोग (Scab), ब्लॅक स्पॉट, फळ कुज, डाऊनी मिल्ड्यू, पावडरी मिल्ड्यू इ.



# केळी

GVT कृषीकुल
**अधिक माहितीसाठी संपर्क:**
82 7373 3030/82 7373 3535

**पिकाचे नाव:** केळी
**वैज्ञानिक नाव:** मुसा पॅराडेसिका
**कुळ:** मुसासी

**लागवड अंतर:** 5x5, 5x6, 5x7, 6x5, 6x6, 6x7 फूट (दोन रोपातील व ओळींमधील अंतर)

**प्रमुख वाण:** ग्रँड नाइन (टिश्यू कल्चर), येळक्की, रेड केळी

**केळीचे गुणधर्म:** भारत हा जगातील सर्वात मोठा केळी उत्पादक देश आहे. आंध्रप्रदेश केळी उत्पादनात पहिल्या क्रमांकावर असून त्यानंतर महाराष्ट्र, कर्नाटक आणि तामिळनाडू या राज्यांचा समावेश होतो. केळी हे बहुगुणी व बहुपोषक फळ आहे. यात भरपूर प्रमाणात तंतू (फायबर), पोटॅशियम व जीवनसत्त्वे आढळतात.

**माती:** पाण्याचा निचरा चांगला होणारी, मध्यम ते काळी माती, सेंद्रिय घटकांनी समृद्ध व pH 6.5–7.5 असलेली जमीन योग्य ठरते.

**उत्पादन:** लागवडीपासून 10–12 महिन्यांनी उत्पादन सुरु होते. प्रति झाड 25–30 किलो (सुमारे 35–40 टन/एकर)

**प्रमुख कीड:** पान खाणारी अळी, थ्रिप्स, मावा, लाल कोळी, पांढरी माशी.

**प्रमुख रोग:** एरविनिया रूट रॉट, सिगाटोका पान डाग, सीएमव्ही, कॉलर रॉट.



# केळी

## ग्रँड नाइन (टिश्यू कल्चर)

**अधिक माहितीसाठी संपर्क:**
82 7373 3030/82 7373 3535

**वाण:** ग्रँड नाइन (टिश्यू कल्चर)
**लागवड दिनांक:** 21/02/2025
**लागवड अंतर:** 5x6 फूट, 9x5x1.5 फूट, 7x4x5 फूट (एकापेक्षा जास्त अंतर पद्धती)
**लागवड क्षेत्र:** 20 R
**एकूण रोप संख्या:** 480

**ग्रँड नैन जातीची वैशिष्टे:** ग्रँड नाइन (G9) हा उच्च उत्पादन देणारा वाण आहे (30 किलो/झाड). याचे घड लांब व बेलनाकार असतात, फळे आकर्षक, टिकाऊ व लांब पल्ल्याच्या वाहतुकीस योग्य असतात. टिश्यू कल्चरकरिता उत्तम व रोग-कीड प्रतिकारक आहे.

**उत्पादन:** सरासरी 25–30 किलो/झाड, जास्तीत जास्त 35–40 किलो/झाड (सुमारे 35–40 टन/एकर).



# केळी

## येळक्की

अधिक माहितीसाठी संपर्क:
82 7373 3030/82 7373 3535

**वाण:** येळक्की
**लागवड दिनांक:** 21/02/2025
**लागवड अंतर:** 5 x 6 फूट
**रोप संख्या:** 140

**येळक्की जातीची वैशिष्टे:** येळक्की केळी (ज्याला इलायची केळी म्हणतात) ही लहान आकाराची, अतिशय गोड व विशिष्ट वासाची असतात. टिश्यू कल्चरमधून उच्च प्रतीची रोपे तयार होतात. विशेष चव व सुगंधामुळे याला बाजारात जास्त मागणी असते.

**उत्पादन:** प्रति झाड सरासरी 15–21 किलो. एका घडात 10–14 हात व 12–15 बोटे असतात, ज्यात 100–150 फळे मिळतात.



# केळी

## रेड केळी

अधिक माहितीसाठी संपर्क:
82 7373 3030/82 7373 3535

**वाण:** रेड केळी
**लागवड दिनांक:** 21/02/2025
**लागवड अंतर:** 5 x 6 फूट
**रोप संख्या:** 140

**रेड केळी जातीची वैशिष्टे:** रेड केळीला लालसर-जांभळा सालीचा रंग व गुलाबीसर पांढऱ्या गुद्यामुळे ओळखले जाते. ही केळी आकाराने लहान व जाडसर असतात. याची चव पिवळ्या केळ्यापेक्षा अधिक गोड व थोडी तुरटसर असते.

**उत्पादन:** प्रति घड सरासरी 15-20 किलो फळे.

